# ज्योतिषशास्त्र

## समज, गैरसमज आणि उपयोग

: लेखक:

विज्ञाननिष्ठ ज्योतिषी

ज्योतिषपंडित **सुधीर दाते**

किंमत : रुपये ३० फक्त

# लेखकाचा
# अनेक क्षेत्रातील योगदानांचा अल्पपरिचय

## ज्योतिषशास्त्र

➩**'ज्योतिषपंडित'** असून ज्योतिषविषयक सध्या चार विषयांच्या संशोधनात कार्यरत.

➩स्थळ संशोधनास अत्यंत उपयुक्त **'वैयक्तिक गुणमेलन कोष्टका'** ची निर्मिती.

➩वैवाहिक जीवन समाधानी होण्यासाठी अत्यंत उपयुक्त**'कुंडलीमेलन संपूर्ण अहवाला'**ची निर्मिती.

➩ज्योतिषविषयक विज्ञाननिष्ठ सल्ला व समुपदेशनासाठी प्रसिद्ध.

➩ज्योतिर्षविषयक अंधश्रद्धा, गैरसमजुती ह्यावरील प्रबोधनात्मक कार्यक्रमाची निर्मिती.

➩**'पंचमस्थान(संतती)** व **'सप्तमस्थान(वैवाहिक जीवन)'** विषयी विशेष उपयुक्त **संशोधन व ग्रंथलेखन** (चालू ).

## संशोधन

➩ **भूत, वर्तमान, भविष्य** काळातील कोणत्याही इंग्रजी तारखेचा वार त्वरीत मिळवून देणाऱ्या अत्यंत सोप्या **'अनंतकालीन दिनदर्शिके'** ची निर्मिती.

➩लीप वर्षांच्या नवीन परिपूर्ण संकल्पनेचे संशोधन. विश्वविक्रमाचा दावा.

## गणित अध्यापन

➩१९६५ पासून 'गणित' अध्यापनाचा व्यासंग.

➩१९८६ पासून २००७ पर्यंत पूर्णवेळ 'गणित' अध्यापनाचे कार्य.

➩गणित विषयाचा पाया पक्का करवून घेण्यात हातखंडा, तोंडी गणितावर भर.

➩विद्यार्थांच्या मनातील 'गणित' विषयाची भीती घालवून आत्मविश्वास निर्मितीसाठी प्रसिद्ध.

➩ 'इ. १०वी चे गीणत' विषयाच्या अप्रतिम मार्गदर्शनाबद्दल महाराष्ट्रात सुपरिचित.

➩१५० पैकी १४८/१४९ गुण मिळविणारे कमीत कमी ३५ ते ४० विद्यार्थी.

➩मार्च २००२ शालांत परीक्षेत १५० पैकी १५० गुण मिळवणारा विद्यार्थी.

➩एस. एस. सी. विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक उपयुक्त राशिभविष्यास पाच वर्षे प्रसिद्धी.

## विशेष योगदान व यश

➩१९९४ साली भूकंपग्रस्त विद्यार्थ्यांना **गणिताचे विशेष मार्गदर्शन** करून जीवन उभे करण्यात मोलाचा वाटा. **संपूर्ण निकाल फिरविण्यात यश.**

➩मार्च २००७ साठी सुनामीग्रस्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी **अंदमान-निकोबारमधे** खास निमंत्रण. तेथेही तीन महिने **हिन्दीतून गणित** अध्यापनाचे अप्रतिम कार्य.

➩**'गणित'** विषयाच्या उद्‌बोधक व्याख्यानांसाठी महाराष्ट्रभर प्रसिद्धी. २५०हून अधिक उद्‌बोधक व्याख्याने.

---

### लक्षात घ्या

☛ज्योतिषशास्त्र आजिबात दैववादी नाही. "दैवात असेल ते बदलता येत नाही" हे मत साफ चुकीचे आहे. तसं सांगणारे खोटं बोलतात. त्यावर विश्वास ठेऊ नका.

☛होय ! दैव बदलले जाते पण व बदलता येते पण.

☛म्हणूनच विवाहाचेवेळी सुखी संसारासाठी पत्रिकामेलन शास्त्रशुद्ध पद्धतीने तपासणे.अत्यंत आवश्यक आहे. तो एक यशस्वी प्रयत्नवाद आहे.

☛पतीपत्नीपैकी एकाच्या पत्रिकेतील कुयोगाचा फटका नुसत्या जोडीदारालाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला सहन करावा लागू शकतो.

☛फक्त **गुणमेलन कोष्टकानुसार पत्रिका जुळणे** हे खरे कुंडलीमेलन नव्हेच.

☛स्वतः सुशिक्षित असूनही ज्योतिषशास्त्र विषयक आपला अशिक्षितपणा आपल्या आयुष्यात वादळे निर्माण करू शकतो. सज्ञान व्हा. समजून घ्या.

# -: अनुक्रमणिका :-


प्रस्तावना

**विभाग १ : सामान्य ज्योतिष**

ज्योतिष हे शास्त्र आहे का?

ज्योतिषशास्त्राची व्याप्ती आणि उपयोग

दैववाद आणि प्रयत्नवाद

ज्योतिषांचे कर्तव्य

जातकांचे कर्तव्य

योग येणे आणि घटना घडणे

जातकांची अपेक्षा आणि फलनिष्पत्तीची शक्यता

**विभाग २ : विवाह विषयक**

विवाह जमविताना गोत्र पहावे का?

विवाहाचेवेळी पत्रिका बघाव्यात का?

पत्रिका पहाण्याची शास्त्रशुद्ध पद्धती

वैयक्तिक गुणमेलन कोष्टके

चुकीची पत्रिका कशी ओळखावी?

विवाहाचेवेळी रक्तगट पहावा का?

विवाहयोग

अपेक्षांचा म. सा. वि.

नोंदणी पद्धतीने विवाह

**विभाग ३ : अन्य विषय**

नक्षत्रशांति करावी का? कधी करावी?

सहस्त्रचंद्रदर्शन

कालसर्पयोग

अंकज्योतिष : किती सत्य, किती असत्य?

खडयांचा उपयोग होतो का?

विनम्र आवाहन


## द्वितीय आवृत्ती

## -: प्रस्तावना :-

ॐ गं गणपतये नमः।

ज्योतिषशास्त्र हा तसा अतिशय उत्सुकतेचा विषय. त्यावर अविश्वास दाखविणारे सुद्धा उत्सुकता मनात दडवून असतात. मोकळेपणाने बोलत नाहीत एवढेच. दुर्दैवाने शास्त्रशुद्ध अध्यापन व्यवस्था ह्या विषयाच्या बाबतीत नसल्याने निष्कारण गूढ शास्त्र, दैववादी बनविणारे शास्त्र असे अनेक प्रकारचे अपप्रचार फोफावलेले आढळतात. विशेष म्हणजे ह्या शास्त्राला बदनाम करण्याचे काम ज्योतिषीच करताना अनुभवास येते.

जे विश्वास ठेवायला तयार आहेत त्यांनाही शास्त्रशुद्ध पद्धतीने सल्ला किंवा उपयुक्त मार्गदर्शन मिळत नाही. त्यांच्या मनात अनेक शंका असतात. परंतु समाधानकारक उत्तरे देणारेच भेटत नाहीत.

माझ्याकडे येणाऱ्या जातकांना माझ्याकडून दिल्या जाणाऱ्या माहितीची शेकडो आवर्तने झाली आहेत. माझे कुटुंबीयसुद्धा ह्या 'रेकॉर्ड'ला कंटाळले आहेत. परंतु प्रत्येक वेळेस जातक नवीन असल्याने परत परत तेच पाढे वाचावे लागतात. अशा परिस्थितीत माझा घसा, कुटुंबियांचे कान आणि वेळ वाचविण्याचा एकच उपाय म्हणजे ही माहिती देणारी पुस्तिका लिहिणे. चाळीस वर्षे विद्यार्थ्यांच्या मनात घुसून गणितासारखा अवघड समजला गेल्याने बदनाम म्हणून गणला गेलेला विषय पचविण्याचे कार्य समर्थपणे केल्यावर हाही संकल्प अवघड वाटला नाही.

२००७ साली प्रथमावृत्ती काढल्यानंतर तिची लोकप्रियता आणि गरज लक्षात आली. म्हणूनच काही शीर्षके वाढवून ही नवीन आवृत्ती तयार करण्यात आली.

ह्या माझ्या प्रयोगात सामान्य जातकास पडणारे नेहमीचेच तेच-तेच प्रश्न नेमके हेरून त्यांचा थोडक्यात परामर्श घेण्याचा मनस्वी प्रयत्न केलेला आहे. ज्यामुळे आता माझ्याकडे येणाऱ्यांना हे परत परत सांगत बसण्यात शक्ती आणि वेळ खर्ची पडणार नाही व माझा घसाही वाचेल. ह्यामाझ्या प्रयत्नाबद्दल वाचकांच्या काय प्रतिक्रिया आहेत हे जाणून घेण्यास मी निश्चितच उत्सुक आहे.

ह्याच निमित्ताने माझ्या ज्योतिषशास्त्रीय समाजोपयोगी उपक्रमांची त्रोटक माहिती आणि थोडयाशा विषयांतराने समाजोपयोगी तात्त्विक विवेचनही देत आहे. त्या उपक्रमांचा समाजाने अवश्य उपयोग करावा ही माझी नम्र अपेक्षा आहे.

गुरुपौर्णिमा, १५ जुलै २०११. -सुधीर दाते

# ज्योतिष हे शास्त्र आहे का?

शास्त्र म्हणजे काय? तर पूर्वानुभवांची संहिता. त्या अनुभवांमागे दडलेला कार्यकारण भाव काय आहे ह्याचा परामर्श घेऊन तयार केलेली प्रणाली. ह्यालाच सिद्धांत म्हणतात. विश्वात अंतर्भूत असणाऱ्या गोष्टीबाबतचे अनुभव, गुणधर्म आणि त्यांचे परिणाम ह्यांची संहिता म्हणजेच शास्त्र.

कोणतीही गोष्ट दिसली म्हणजेच असते असे मुळीच नाही. कारण दिसणे हा सुद्धा मनुष्यप्राण्यास लाभलेल्या ज्ञानेंद्रियांच्या कक्षेत बसणारा अनुभव असतो. ह्या कक्षेबाहेर असणाऱ्या गोष्टींचे ज्ञान त्यास मिळू शकत नाही. म्हणजे ती गोष्ट नसते असे नाही.उदाहरणार्थ, प्रकाशकिरण सरळ रेषेत प्रवास करतो हा सिद्धांत मांडणाऱ्यानेच नव्हे तर त्या आधी आणि त्यानंतरही कोणी प्रकाशकिरण पाहिलेला नाही. तर तो किरण जेथे आपटला तेथे उजेड पडल्याचे पाहिले आहे. त्यावरून त्याच्या मार्गाचा सिद्धांत मांडला जातो. म्हणजेच प्रकाश पडतो म्हणून किरण पोहोचत असावा हे अनुमान असते.

तसेच  मानसशास्त्रसुद्धा प्रत्यक्ष दृष्टीस कोणतेही कारण दिसत नसताना अनुभवांवर आधारित असून त्यातही तर्कसंगत उपाय योजनाच  केली जाते. हे जर सर्वमान्य असेल तर 'ज्योतिष' हे शास्त्र मान्य करावेच लागेल.

अंतरिक्षातील ग्रह, तारे ह्यांना गुरुत्वाकर्षण नावाची शक्ती प्राप्त असते हे सुद्धा अनुभवाअंतीच मान्य करण्यात आलेले आहे. त्याच ग्रहांना, ताऱ्यांना गुरुत्वाकर्षणाव्यतिरिक्त इतर अनेक गुणधर्म असतात. त्यांचा पृथ्वीतलावरील मानवी जीवनावर विशेषत्वाने परिणाम अनुभवास येतो. हे अनुभव प्रत्ययास आल्यावर त्यांची केलेली नोंद म्हणजेच संहिता तयार केली गेली. त्यालाच 'ज्योतिषशास्त्र' संबोधले आहे. थोडक्यात 'ज्योतिष' हे शास्त्र आहे असेच इथे सिद्ध होते.

आता ह्या शास्त्रात समाविष्ट असणाऱ्या गोष्टी म्हणजे  राशि, नक्षत्रे, स्थिर तारे, ग्रह ह्या सर्वांचा गरजेनुसार खोलवर साकल्याने अभ्यास करून परिणाम काय असेल ह्याचा वेध घेताना जास्त क्लिष्टता प्रत्ययास येते. परिणामतः ह्या शास्त्रास 'गूढ' शास्त्र म्हणून संबोधले जाते.

सामान्य माणसास मात्र खगोलशास्त्र व ज्योतिषशास्त्र ही गूढ वाटतात. त्याचे कारण  म्हणजे दुर्दैवाने आपल्या शिक्षण व्यवस्थेत ह्या शास्त्रांचा समावेश हवा तसा करण्यात आलेला नाही हेच खरे. परिणामतः ह्यातील शब्दप्रयोग हे नेहमीच्या परिचयातील नसल्याने, अर्थबोधास कठीण भासतात.

ह्या गूढतेचे वलय निष्कारण निर्माण झालेल्या शास्त्राला आणखी गूढ बनविण्याचा उपद्व्याप भोंदू ज्योतिषी करतात ही वस्तुस्थिती आहे. तसा माझा अनुभवही आहे.  त्यासाठी समाजानेच आता सतर्क होण्याची गरज आहे. कारण ह्या निर्माण केलेल्या गूढतेच्या वलयाचा अनेक ज्योतिषी गैरफायदा घेताना आढळतात.

# ज्योतिषशास्त्राची व्याप्ती आणि उपयोग

ज्योतिष हे शास्त्र आहे का ह्यासंबंधी विवेचनानंतर आता ह्या शास्त्राच्या सीमा आणि व्याप्ती ह्यासंबंधी माझ्या ज्ञानानुसार आणि अनुभवानुसार विवेचन असे.

खगोलशास्त्र म्हणजे विश्वातील ग्रहताऱ्यांविषयी अभ्यासाचे शास्त्र. ह्यातील गणितानुसार सूर्यमालेतील सर्व ग्रह, त्यांच्या गती, त्यांची स्थाने ह्यांचा विचार करून पृथ्वीसभोवताली मनुष्याच्या जन्माच्या वेळी कशी स्थिती आहे ह्याचा नकाशा मांडला  की त्याला म्हणतात 'जन्मकुंडली'. जन्मकुंडली तयार करण्यासाठी ग्रहताऱ्यांच्या जागा गणिताने ठरवितात. येथून पुढे खरे ज्योतिष सुरू होते. ह्या तयार झालेल्या नकाशाचे वाचन ज्योतिषी करीत असतात. त्यानुसार दैवाने त्या व्यक्तीस काय काय प्राप्त झाले आहे ह्याचा बोध होतो. ह्यालाच  'दैवयोग' ही रूढ संज्ञा आहे. नकाशा जितका स्पष्ट तितका दैवाने मिळालेल्या गोष्टींचा वेध घेणे सोपे जाते. अर्थातच त्यासाठी ज्योतिषाच्या अनुभवास, निरीक्षण शक्तीस, तर्कसंगत विचारसरणीस अनन्यसाधारण महत्त्व आहे.

बोली भाषेत जे दैवाने मिळाले तसे योग आहेत व जे दैवाने मिळाले नाही तसे योग नाहीत असे संबोधण्याची प्रथा आहे. आता, दैवाने मिळालेल्या गोष्टी त्या व्यक्तीच्या अपेक्षेनुसार जर नसल्या तर त्या त्याला कधीच मिळू शकतच नाहीत असे नाही. योग्य वेळी, योग्य दिशेने व योग्य ताकदीने प्रयत्न केल्यास प्रयत्नास यश लाभू शकते. प्रयत्नवाद आणि दैववाद ह्याबद्दल अधिक ऊहापोह आपण पुढील विवेचनात करणार आहोत.

# ज्योतिषशास्त्र, दैववाद आणि प्रयत्नवाद

जगातील सर्व शास्त्रे मनुष्याचे जीवन जास्त सुकर व समाधानी व्हावे म्हणूनच प्रगत केली जातात. ती सर्व प्रयत्नवादावरच आधारित असतात.ज्योतिषशास्त्रसुद्धा त्याला अपवाद नाही.तेही संपूर्णपणे प्रयत्नवादावरच आधारित आहे. परंतु दुर्दैवाने ह्या शास्त्राभोवती गूढतेचे वलय निर्माण केले गेले आणि दैववादी शास्त्र म्हणून त्यास काळ्या यादीत समाविष्ट करण्यात आले.

अर्थात ह्या अनर्थाला ज्योतिषीच जबाबदार आहेत असा माझा ठपका आहे.

एकीकडे पत्रिकेत जे असेल ते चुकणारच नाही असा दावा करायचा आणि दुसरीकडे विवाहाच्यावेळी पत्रिका बघण्यास सांगायचे हे ज्योतिषांचे दुटप्पी धोरण म्हणावे लागेल. पत्रिका बघण्याने नशिबात बदल होणार का? जर होणार असेल तर  नशीब बदलता येत नाही हा दावा चुकीचा होतो आणि जर होणार नसेल तर पत्रिका पहाण्याचा फार्स  का करायचा? ह्या प्रश्नांची समर्पक उत्तरे ज्योतिषांकडे नसतात असा अनुभव आहे.जर आपल्या नशिबाने मिळालेल्या गोष्टींवर आपला काहीही इलाज नसेल तर ज्योतिषशास्त्र अभ्यासण्याची, प्रगत करण्याची गरजच नाही. फुकट वेळ वाया घालविणे नाही का? परंतु तसे नाही. जरी पुण्यातले सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ ज्योतिषशास्त्रावर अंधश्रद्धा म्हणून शिक्का मारत असले तरी त्यांचेकडे दुर्लक्ष करणेच बरे. कारण ह्या शास्त्रात अर्थच नसता तर लोकमान्य टिळकांसारख्या जगन्मान्य विद्वान असनाऱ्या व्यक्तीने वेळात वेळ काढून ह्याचा व्यासंग जोपासला नसता. उलट जगाला ओरडून सांगितले असते की, 'हे थोतांड आहे'. परंतु तसे न करता उलटपक्षी स्वतःचे पंचांग त्यांनी काढले. माझ्या मते एवढा पुरावा हे शास्त्र आहे हे सिद्ध करण्यास पुरेसा आहे. त्यामुळेच  'एकविसाव्या शतकात ज्योतिष कसले बघता?' म्हणणाऱ्यांच्या बुद्धीची कींव करावीशी वाटते. सांप्रत खगोलशास्त्रज्ञांचे जर असे मत असेल की लोकमान्य विद्वान नव्हते तर मात्र खरं विद्वान कोण हे जगास आपोआपच कळेल.

# ज्योतिषांचे कर्तव्य

कोणतेही शास्त्र हे समाजाच्या उपयोगासाठी, उत्कर्षासाठी, समाजजीवन सुकर होण्यासाठीच प्रगत केलेले असते. ज्योतिषांनी

शास्त्रकार म्हणून त्याचा प्रसार करण्याचा मनोमन प्रयत्न तर केला पाहिजेच. त्याच्याच बरोबर ग्रंथात आहे तेच बरोबर अशी डोळयावर झापडं लावल्यासारखी भूमिका न घेता डोळसपणे खऱ्याखोटयाची शहानिशा करणे अत्यंत गरजेचे आहे. ह्या संदर्भातील माझी निरीक्षणे तर इथे मांडत आहेच. परंतु त्याचबरोबर अन्य ज्योतिषांच्या अभ्यास करण्याच्या पद्धतीबद्दलची मला आढळलेली उदाहरणेही इथे लिहिण्याचा मोह मला आवरत नाही आहे.

पुण्यातील एका नामवंत ज्योतिषांचे 'पंचमस्थान' व 'सप्तमस्थान' हे ग्रंथ खूप प्रसिद्ध पावलेले आहेत. त्यांच्या अनेक आवृत्त्याही प्रकाशित होत आहेत. ह्या ग्रंथांमधे ढोबळमानाने मला सापडलेले दोष पुढील प्रमाणे आहेत.

'पंचमस्थान' हा संतती संबंधी तर 'सप्तमस्थान' हा वैवाहिक जीवनासंबंधी ग्रंथ आहे. मुळात हे दोनही विषय पती आणि पत्नी ह्यांच्याशी संबंधित आहेत. असे असताना लेखकाने उदाहरणे देऊन विश्लेषण करताना दोन्ही ग्रंथातील सर्व उदाहरणात फक्त पतीची किंवा पत्नीचीच पत्रिका देऊन ऊहापोह केलेला दिसतो. हे मला चुकीचे वाटते. कारण एकाचीच पत्रिका देण्याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, त्या पत्रिकेत तसा योग होताच असे लेखकाचे ठाम मत दिसते. जोडीदाराच्या पत्रिकेतील योगांमुळेही तशी घटना घडू शकते ह्याचा विसर लेखकास पडलेला असावा. तसा योग दोघांच्या पत्रिकेत सापडेलच ह्याचीही खात्री नसते. एकाच्या पत्रिकेतील अशुभ योगांची झळ जोडीदारास सहन करावी लागू शकते. म्हणूनच विवाहाचेवेळी पत्रिका पहाण्याला अनन्य साधारण महत्त्व येते. म्हणूनच सर्व उदाहरणांमधे दोघांच्याही पत्रिकांचे आणि दोघांमधील समन्वयाचे विश्लेषण आवश्यक होते.

दुसरी महत्त्वाची चूक मला सापडली ती म्हणजे पंचमस्थान ह्या ग्रंथामधे 'कन्या संतती' ह्या शीर्षकाखाली दिलेल्या अनेक उदाहरणात स्त्रीयांच्या पत्रिका दिलेल्या आहेत. खरं पाहिलं तर जगातील सर्व शास्त्रे एकमेकांशी निगडीत असतात. वैद्यकीय शास्त्र हेच सांगते की, मुलगा होणे किंवा मुलगी होणे हा स्त्रीचा गुणधर्मच नव्हे तर तसे केवळ पुरुषातील गुणसूत्रांमुळेच घडते. म्हणजेच ज्योतिषांनीसुद्धा नुसते पोथीनिष्ठ न राहता इतर शास्त्रांचाही गरजेनुसार अभ्यास करून विज्ञाननिष्ठ असणे फक्त आवश्यकच नाही तर त्याबरोबर समाजप्रबोधन करण्याची जबाबदारी स्वीकारणेही आवश्यक आहे. कारण समाजात अनेक अनिष्ट रुढया अशुभ पद्धतीने बोकाळलेल्या असतात. 'मुलगी होणे हे वाईट' ही जशी अनिष्ट, अशुभ रुढी तशीच मुलीच झाल्या म्हणून सासूने सुनेलाच गुन्हेगार ठरविल्याची अनेक उदाहरणे बघायला मिळतात. फक्त मुली होणे हा जर दोष असेल तर तो आपल्या मुलातच आहे हे मान्य करायला त्या सासवा का तयार होत नाहीत? डॉक्टरांतर्फे ह्या बाबतीत प्रबोधन नेहमी केले जात असले तरी त्यांच्या खांद्याला खांदा लावून शास्त्रकार म्हणून ज्योतिषांनीही ही जाबाबदारी पार पाडली पाहिजे असे माझे प्रांजल मत आहे. कारण सोनारानेच कान टोचलेले बरे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ज्योतिषशास्त्राचा हवा तसा आणि योग्य पद्धतीने प्रसारच झालेला नसल्याने आणि ह्यातील भाषा समाजाच्या नेहमीच्या परिचयाची नसल्याने फक्त तोंडी सल्लामसलत केल्याने ह्या शास्त्राची गूढता आणि अपप्रचार निष्कारण वाढतच राहतो. ह्यावर अंकुश ठेवण्यासाठी, ज्याप्रमाणे डॉक्टर्स आपले रिपोर्टस लेखी स्वरुपात देत असतात त्याचप्रमाणे ज्योतिषांनीही आपले म्हणणे कारणांच्या विवरणांसहित लेखीच द्यावे असे माझे ठाम मत आहे.निदान मी तरी ही शिस्त पाळतो.

शास्त्रीय ग्रंथांमधेही चुका असू शकतात. कारण त्या ग्रंथकाराच्या ज्ञानानुसार व त्यांच्याकडील उपलब्ध माहितीनुसार त्या ग्रंथाचे लिखाण होत असते. त्याची सत्यासत्यता अभ्यासकांनी करणे निश्चितच आवश्यक असते. त्याचे उदाहरण आता पाहू या.

स्त्रीच्या मासिक पाळीपासून पुढे सम दिवशी पतीपत्नींचा संबंध आल्यास पुत्रसंतती व विषम दिवशी आल्यास कन्या संतती होते असे विधान ग्रंथात आढळते. हे साफ चुकीचे आहे. कारण लिंगाची शक्यता पुरुषावर अवलंबून असते स्त्रीवर नाही ही वस्तुस्थिती आता वैद्यक शास्त्रामुळे उघड झालेली आहे. तरीही वरीलप्रमाणेच हिशेब करणारे ज्योतिषी माझ्या पहाण्यात आहेत.

ज्योतिषांनी माझ्या वरील विवेचनाबद्दल स्वयंचिंतन अवश्य करावे.

# जातकांचे कर्तव्य

जे ज्योतिषांकडे प्रश्न विचारायला जातात त्यांना जातक असे म्हणतात.

ज्योतिषाकडे जाण्यापूर्वी त्या ज्योतिषाच्या शास्त्रीय ज्ञानाविषयी माहिती असणे जरुरीचे आहे. त्याचे शिक्षण कुठे झालेले आहे? त्याची स्वतःची विचारपद्धती काय आहे? तो शास्त्रशुद्ध पद्धतीने विवेचन करतो का? त्याने स्वतः ह्या शास्त्राच्या प्रगतीसाठी काय केले आहे? ह्या गोष्टींची माहिती घेतल्याशिवाय जातकाने जाऊ नये. ह्या क्षेत्रातील हौशी कलाकार म्हणजे नुसती पुस्तके वाचून सल्ले देणाऱ्यांपासून दूर रहावे.

काही ज्योतिषी अध्यात्म आणि ज्योतिष ह्या दोन्ही तथाकथित गूढ शास्त्रांची जातकाच्या मानसिकतेचा गैरफायदा घेऊन सांगड घालतात व जातकाच्या पत्रिकेत किंवा घराण्यात दोष असल्याचे ठसवतात. काही ज्योतिषी उपाय सांगतात. खरं पाहिलं तर ज्योतिषशास्त्रात उपाय नाहीत. त्याविषयी विवेचन पुढे केले जाणार आहे. काही ज्योतिषी जातकाच्या अज्ञानाचा, अगतिकतेचा गैरफायदा घेऊन जबरदस्त आर्थिक फायदा लाटताना अनुभवास येतात. जातकांच्या अंधश्रद्धेचेच हे बळी म्हणावे लागते.

कोणाच्याही लग्नाची तारीख वगैरे कधीच काढून देता येत नसते. कारण योग येणे आणि घटना घडणे ह्या गोष्टी वेगळया आहेत. त्यासंबंधी विवेचन पुढे येणार आहे. परंतु त्यासाठी महागडे उपाय करवून घेतेवेळी आपण कोणती गोष्ट केवढयाला विकत घेतो आहोत ह्याचा तरी विचार करावा.

कोणत्याही ज्योतिषाचे काहीही म्हणणे असू दे, परंतु ते त्याने कारणाच्या स्पष्टीकरणासह कागदोपत्री लिहून आणि ते सुद्धा शक्यतो

लेटरहेडवर द्यावे. तसा जातकानेही हट्ट धरावा.

कोणीही सांगितले की, 'आमके एक छान पत्रिका पहातात. त्यांचेकडे खूप गर्दी असते' म्हणून लगेच त्यांचकडे जाऊ नये. एक चाचणी म्हणून आपल्याजवळ एखादी चुकीची पत्रिका ठेऊन ती त्यास ओळखता येते का हे तपासायलाही हरकत नाही.

# योग येणे आणि घटना घडणे

पूर्वीच्या विवेचनात हे सांगितले गेले आहे की, ज्योतिषशास्त्राचा उपयोग करून दैवाने आपल्याला काय मिळाले ह्याचा मागोवा घेता येतो. जे मिळाले असेल ते अपेक्षेप्रमाणे नसेल तर प्रयत्न करून म्हणजेच उपाय करून ते साध्यही करता येते. थोडक्यात 'पत्रिकेत असेल तेच घडते' ह्याचे समर्थन सुजाण ज्योतिषाने तरी करू नये.

एखाद्या अपघातात अनेक व्यक्ती मरण पावल्या तर त्या सर्वांच्या नशिबात एका वेळेस मरायचा योग असतो का? ह्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी खरंच ज्योतिषाची गरज असते का? निश्चितच नाही. कारण कोणीही सांगू शकेल की तसे असू शकत नाही. त्यासाठी ज्योतिषाची गरजही नसते. परंतु ह्याचा अभ्यास होणे मात्र गरजेचे आहे. पण त्याच्याच बरोबर पत्रिकेत योग नसताना ते घडले हेही मान्य करावे लागेल.

हे झाले योग नसताना घटना घडल्याचे उदाहरण. आता योग नसताना घटना घडवून आणल्याचे एक उदाहरण पाहू या.

एक पत्रिका स्वतःच्या घराच्या दृष्टीने 'योग नाहीत' ह्या सदरात मोडेल इतक्या अशक्त योगाची आहे. पण तरीसुद्धा ज्या काळात घर होण्यासाठी ग्रहस्थिती काही प्रमाणात अनुकूल होती त्याच्याच जोडीला योग्य रितीने प्रयत्नांची अक्षरशः शिकस्त केल्यावर स्वतःचे घर लाभल्याचे उदाहरण माझ्याकडे आहे.

आता योग असताना घटना घडू न दिल्याची दोन उदाहरणे पाहू या.

हल्ली सॉफ्टवेअर क्षेत्रात नोकऱ्या करणाऱ्या तरूण पिढीकडे लायकी आणि गरजेपेक्षा जास्त पैसा हाती येत असतो हे सर्वश्रुत आहेच. परिणामतः त्यांची मनोवृत्ती भोगवादाकडे झुकताना आढळते. साहजिकच पाश्चिमात्य संस्कृतीचे भूत त्यांच्या मनावर स्वार झाल्याने भोगवादी वृत्ती बळावलेली जाणवते. म्हणूनच विवाह केल्यानंतर तीन-तीन, चार-चार वर्षे ते मूल होऊ देत नाहीत. साधने वापरत असतात.

आता योगांचा विचार केला तर त्या सर्वांच्याच पत्रिकात उशीरा संततीचा योग असू शकतो का? ते अशक्य आहे. म्हणजेच योग आलेले होते तरी घटना घडली नाही हे मान्य करावे लागते. असे करणे योग्य की अयोग्य हा वेगळा विषय आहे. परंतु ह्या ठिकाणी प्रयत्नाने दैवावर कुरघोडी केली हे मान्य करावे लागते.

सध्या खास करून मुलींच्या बाबतीत प्रकर्षाने येणारा अनुभव म्हणजे विवाहाचे योग येऊनही त्यांचे विवाह जुळत नाहीत. ह्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या अवास्तव अपेक्षा. थोडक्यात, ज्यावेळेस ग्रहस्थिती पूरक आहे त्यावेळेस तिचा लाभ उठवायचा असेल तर वाजवी अपेक्षा असणे, त्यासाठी मुली आणि त्यांचे पालक खऱ्या अर्थाने सुशिक्षित होणे गरजेचे आहे.

थोडक्यात, मनुष्यप्राण्याच्या आयुष्यातील घटना दैव आणि प्रयत्न ह्या दोन्हीवर अवलंबून असतात हेच ह्यावरून सिद्ध होते. काही उदाहरणात दैव आणि प्रयत्न ह्यातील जे सरस ठरेल त्यानुसार परिणाम दिसतो. ही लक्षात घेण्याजोगी बाब आहे.

## जातकांच्या अपेक्षा आणि फल निश्चितीची शक्यता

अनेकांचा असा गैरसमज असतो की जन्मवेळच चुकीची असेल तर पत्रिका करण्यात काहीच अर्थ नाही. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. त्याबद्दलचे विवेचन असे -

मूलतः ३०° ची राशि, १३°२०'व्याप्तीची नक्षत्रे अंतरिक्षात आखीव रेखीव मोज मापात नसतातच. जशा राशि लहानमोठया व्याप्तीच्या आहेत तशी नक्षत्रेसुद्धा आहेत. एवढेच नव्हे तर एकापाठोपाठ एक सलग नक्षत्रेही नाहीत. काहीवेळेस दोन नक्षत्रांचा काही भाग एकमेकांवर येतो. अशा परिस्थितीत केवळ गणिताच्या सोयीसाठी त्यांची व्याप्ती मानलेली असते. परिणामतः एका राशितून दुसऱ्या राशित ग्रहाने प्रवेश केला की लगेचच फळे मिळणार ही शक्यता जशी काल्पनिक ठरते त्याच नियमाने कदाचित राशिप्रवेश करण्यापूर्वीही फळे मिळणे शक्य आहेच ना? तसे अनुभव अनेकदा येतातही.

थोडक्यात जन्मवेळेत १०-२० मिनिटांचा फरक पडला तरी पत्रिकेत लक्षात येण्याजोगा फरक पडणाऱ्या पत्रिका फारच कमी म्हणजे नगण्य प्रमाणात आढळतात.

पत्रिकांच्या सूक्ष्मतेबद्दल जशी वर वर्णन केलेली परिस्थिती असते त्याचप्रमाणे जातकांच्या अपेक्षा म्हणजे विवाह नक्की केव्हा होईल? कोणत्या दिशेचा किती अंतरावरचा जोडीदार मिळेल? ह्यांचे समाधान करणे अशक्य असते. असे प्रश्न विचारूही नयेत. मागे वर्णन केल्याप्रमाणे योग असले तरी घटना घडतीलच ह्याची निश्चिती नसते. ज्योतिषशास्त्रानुसार योगाची ताकद अजमावता येते. परंतु फलनिष्पत्ती अनेक इतर गोष्टींवरही अवलंबून असते.

जातकांच्या अपेक्षांमधे एकवैशिष्ट्यपूर्ण अपेक्षा अशी असते की ज्योतिषांनी निश्चित अशी माहिती द्यायलाच हवी. परंतु ज्योतिषशास्त्रात दोन अधिक दोन चार असा साधा सरळ आणि सोपा हिशेब करता येत नाही. ज्याप्रमाणे इंजिनिअरिंगमधील अप्लाईड मेकॅनिक्स विषयात अनेक प्रेरणांची परिणामी प्रेरणा काढतात त्याचप्रमाणे ज्योतिषशास्त्रातही घडते. फरक एवढाच की काळ, स्थळ, प्रदेश, सामाजिक परिस्थिती ह्यांचे आकलन झाल्याशिवाय मूळच्या प्रेरणा नीट कळतच नाहीत. त्यामुळे परिणामांचा वेध घेणे अत्यंत अवघड असते. ह्यासाठीच डोळस निरीक्षण व अनुभवाची नितांत गरज असते. उदाहरणार्थ एखाद्या मुलीच्या बाबतीत विवाहास थोडाफार विलंब होण्याची शक्यता आहे असा अंदाज असेल तर

शहरी मुलीच्या बाबतीत २८-३० वय असू शकेल तर खेडेगावात अजूनही कायदे गुंडाळून १२-१३ व्या वर्षी विवाह होत असल्याने १६ वयसुद्धा त्याबाबतीत उशिराचेच मानले जाईल. ह्याचे अवधान ज्योतिषास असायला हवे.

परदेशांमधे अनेकवेळा घटस्फोट सहजपणे घेतले जातात. म्हणून त्या प्रदेशांमधील पत्रिकांचा विचार करताना घटस्फोटाला विशेष महत्त्व देणे चुकीचे ठरेल. मात्र भारतीय संस्कृतीनुसार घटस्फोटाला महत्त्व देणे गरजेचे असते.

थोडक्यात, एकाच आजाराबद्दलची अनेक डॉक्टरांची निदाने व औषधप्रणाली निरनिराळी असते. तितकी मोकळीक मात्र ज्योतिषांना द्यायला समाज तयार नसतो असा अनुभव आहे. म्हणजेच ज्योतिषशास्त्राचा उपयोग मार्गदर्शक शास्त्र म्हणून कसा करायचा ह्याचे मर्म मात्र ज्योतिषांना आणि त्या अनुषंगाने समाजाला समजणे आवश्यक आहे.

# ज्योतिषशास्त्र आणि उपाय

मुळात ज्योतिषशास्त्र म्हणजे दैवाने आपणास कायकाय दिले आहे हे जाणून घेण्याचे शास्त्र. त्याची मर्यादा तेथेच संपते. त्यानुसार मिळालेल्या काही गोष्टी आपल्याला अनपेक्षित, अयोग्य किंवा अशुभ वाटत असतील तर त्यावरील उपाय हे शास्त्राच्या कक्षेत बसत नाहीत.

जसे सोलापूर भागात पाऊस कमी पडतो हे शास्त्र सांगते. परंतु पडलेला पाऊस साठवून ठेवणे हे प्रयत्नवादाच्या कक्षेत बसते. त्याचप्रमाणे ज्योतिषशास्त्रात उपाय नाहीत, तर जे उपाय आहेत ते सर्व एकतर अनुभवाधिष्ठित, पारंपारिक आहेत किंवा सिद्धयोग्यांनी स्वेच्छेनुसार केलेले आहेत.

आता अनुभवाधिष्ठित पारंपारिक उपाय कोणत्या प्रकारचे व कसे असतात ते पाहू. उदाहरणार्थ, जन्मनक्षत्रशांतिचा किंवा ग्रहशांतिचा विधी, निरनिराळी स्तोत्रे, नामस्मरणाचे जप, अन्न, वस्त्र, सुवर्ण, अर्थदान,इत्यादी. हे उपाय निरनिराळया अपेक्षांसाठी उपयुक्त म्हणून अनुभवाने सिद्ध झालेले आहेत.

सिद्धयोगी, सत्पुरुषांमधे परमेश्वरी अंशाचा अविष्कार खूपच जास्त प्रमाणात असतो. परिणामतः नियतीने किंवा दैवाने दिलेल्या गोष्टी बदलण्याची ताकद त्यांच्यात असते. अर्थातच अशा गोष्टींना सामान्य माणसे जरी चमत्कार म्हणत असले तरी त्या चमत्कारांमधे काही अशास्त्रीय आहे असे मला वाटत नाही. ह्या महापुरुषांनी ते करून दाखवावेत अशी अपेक्षा करणे किंवा तसे त्यांना आव्हान देणे हेच खरे अशिक्षिताचे लक्षण आहे. ते जादूचे प्रयोग नव्हेत व प्रदर्शनीयही नव्हेत. एवढेच नव्हे तर साधकाच्या इच्छेनुसार सत्पुरुषांनी ते केलेच पाहिजेत असेही नाही. मात्र अशा सत्पुरुषांच्या आशीर्वादाने, अनुग्रहाने अनेकांची दुःखे, संकटे निवारण होतात ह्यात शंका नाही.

# विवाह जमविताना गोत्र पहावे का?

गोत्रांच्या नावांचे निरीक्षण केले तर हे लक्षात येते की, ती सर्व ऋषिंची नावे आहेत. ह्यावरून असा बोध होतो की ऋषिंच्या शिष्य समुदायास गोत्र म्हणत असावेत. म्हणजेच गोत्राचा जन्मवेळेशी संबंध नाही. आता ते ऋषिही हयात नाहीत. त्यामुळे विवाह जमविताना गोत्र विचारात घेऊ नये असा एक मतप्रवाह आहे.

दुसरी एक विचार सरणी अशी आहे जी अनुभवाधिष्ठित आहे. सगोत्रांचे अनेक विवाह झालेले आहेत.अशा जोडप्यांच्या बाबतीत एक अनुभव लक्षणीय संख्येने असा आहे की, त्यांच्या संततीत वैगुण्य आहे. अर्थात हा अनुभव १०० % उदाहरणात अनुभवायला मिळत नसला तरी बऱ्याच आणि लक्षणीय प्रमाणात अनुभवास येतो ही वस्तुस्थिती आहे.

आता हे असे का होते ह्याची कारणमिमांसा ग्रंथांमधून सापडत नाही. म्हणजे ते सध्यातरी ज्ञात शास्त्राच्या कक्षेबाहेर आहे. अशी परिस्थिती प्रत्येक शास्त्राच्या बाबतीत असतेच. शास्त्राला परिपूर्णता कधीच नसते.

वरील दोन्ही विचारप्रवाहांचा परामर्श घेतल्यास ह्या निर्णयाप्रत आपण येतो की, अज्ञानामुळे नुकसान होण्यापेक्षा विषाची परीक्षा न घेणेच शहाणपणाचे. म्हणून ज्योतिषाच्या भूमिकेतून माझे मत असे आहे की, **गोत्राचा विचार अवश्य करावा.**

वधूवरांचा विवाह ठरतो आहे. परंतु सगोत्र किंवा न जुळणारी गोत्रे आहेत. अशावेळेस दोघांपैकी एकास दत्तक देऊन गोत्र बदलणे साफ चुकीचे असते. अशातऱ्हेने गोत्र कधीही बदलत नसते. ही अनिष्ट रुढी पाळू नये.

# विवाहाचेवेळी पत्रिका बघाव्यात की नाहीत?

विवाहाचेवेळी पत्रिका बघणे ह्या विषयी समाजात प्रचंड अज्ञान असल्याचे आढळते. त्यामुळेच ज्यांचे विवाह पत्रिका न पाहता झालेले आहेत त्यांच्या तोंडून "आम्ही आमच्यावेळी कुठे पत्रिका बघितली होती?" अशी वाक्ये ऐकायला मिळतात. खरं पाहिलं तर त्यांनी पत्रिका बघितली नव्हती तरीही त्यांचा संसार कदाचित उत्तम झालाही असेल. म्हणून
कोणाचाही होऊ शकतो असा प्रतिपादित गर्भितार्थ त्यांच्या विधानात जरी त्यांना ठसवायचा असला तरी हे विधान शास्त्रसंमत आणि तर्कसंगत होऊ शकत नाही. त्याऐवजी 'आम्ही पत्रिका बघितली नव्हती व नंतर अभ्यासली तर ती जुळत नाही. तरीही आमचा संसार उत्तम कसा झाला हे शास्त्रकारांनी ठरवावे' असे त्यांचे विचार असले तर त्यांची वैचारिक बैठक मान्य करावी लागेल. परंतु असे किती जण म्हणतात हेही अभ्यासावे लागेल. सहसा असा अनुभव येत नाही.

त्याचप्रमाणे पत्रिका बघून विवाह करणारांच्यातही विविध प्रकार अनुभवायला मिळतात. काहीजण म्हणतात, " आम्हाला तशी खोलवर पत्रिका बघायची नाही. गण, गोत्र, नाडी जमली, बस." तर काहीजण म्हणतात, "आम्हाला वरवर पत्रिका बघायचीय." काही जणांच्या कुटुंबात

हौशी अभ्यासक असले तर तेही त्यांच्या ज्ञानाच्या कक्षेनुसार पत्रिका पहातात. काहीजण ज्योतिषांकडे जातात. परंतु त्यांच्याकडूनही शास्त्रशुद्ध बघणे होत नाही असे माझे ठाम मत आहे. कारण ९० % हून अधिक ज्योतिषांना पत्रिका बघायची म्हणजे नक्की काय करायचे ह्याचे आकलन झालेले नसते. असा माझा अनुभव आहे.

ह्याशिवाय पत्रिका बघण्याच्या संबंधात अनेक गैरसमज प्रचलीत असतात. जसे मंगळदोष नसताना आहे असा समज असणे, एकनाड जमत नाही, ३६ गुण नसावेत, १८ पेक्षा कमी गुण चालत नाहीत, इत्यादी. थोडक्यात, ज्योतिषशास्त्र म्हणजे नक्की काय व त्याचा व्यवहारात नक्की उपयोग कसा करायचा ह्यासंबंधी प्रचंड अंधार जाणवतो. त्यातून ह्या शास्त्रातील निरनिराळे व न उमजणारे शब्द गूढता वाढवतात. परिणामतः हे एक गूढ शास्त्र आहे व संपूर्णपणे दैववादावर आधारित आहे असा प्रचलीत गैरसमज पदोपदी जाणवतो.

पत्रिका बघण्याच्या मर्यादित क्षेत्राबद्दल बोलायचे झाले तर वधू-वरांच्या पत्रिका ह्या त्यांना दैवाने मिळालेल्या अनेक गोष्टी दर्शविणारे आरसे असतात. त्या एकमेकांशी जुळतात की नाही पहाण्यासाठी सर्वप्रथम दोघांच्या स्वभावांचा विचार होतो. त्यानंतर, पुढे उभयताना संसार करायचा आहे म्हणून संसार आणि पूरक व्यक्तिमत्त्व ह्यांच्याशी संबंधित चार स्थानांचा विचार करायचा असतो. ती स्थाने म्हणजे लग्न, पंचम, सप्तम व भाग्य. लग्न स्थानावरून पूरक व्यक्तिमत्त्वांसंबंधी विचार तर पंचमस्थानावरून संततीविषयक. सप्तमस्थानावरून एकमेकांचे सहकार्य, जोडून राहण्याची वृत्ती तर भाग्य स्थानावरून एकमेकांमुळे एकमेकांचा भाग्योदय ह्यांचा विचार होतो.

हे सर्व पद्धतशीर व नीट पहाणे ह्यालाच 'पत्रिका पहाणे' असे संबोधणे योग्य होईल.

आता ज्योतिषशास्त्रावर विश्वास ठेवायचा की नाही हा ज्याचात्याचा वैयक्तिक विचार होईल. परंतु हे शास्त्र आहे व अत्यंत उपयुक्तही आहे. उपयोग करायचा की नाही हे ज्याचे त्याने ठरवावे. परंतु माझे स्वतःचे अनुभवाधिष्ठित मत विचाराल तर ह्या शास्त्राचा उपयोग न करणे व अपप्रचार करणे हे निश्चितच अडाणीपणाचे लक्षण होय. ह्यासाठी समाजप्रबोधनाची गरज आहे. तेच करण्याचा ह्या छोटयाशा लिखाणातून मी प्रयत्न केलेला आहे.

# पत्रिका पहाण्याची शास्त्रीय पद्धती

विवाहाच्या मुहूर्तावर एक पुरुष व एक स्त्री भावी काळात एकत्र संसार करण्याच्या निश्चयाने एकत्र जीवन जगण्यास सुरुवात करीत असतात. ही दोन जीवनरथाची चाके चिरकाल व्यवस्थित चालायला हवी असतील तर मुळात उभयतांचे स्वभाव जुळते असणे गरजेचे आहे. पुष्कळ वेळा पूर्वायुष्यात ही व्यक्तिमत्त्वे एकमेकांच्या परिचयाची सुद्धा नसतात. मग त्यांचे स्वभाव जुळणार की नाही हे कसे ठरवावे? ह्यासाठी जन्मपत्रिकांचा उपयोग होतो. माणसाचा स्वभाव हा त्याच्या जन्माच्या वेळी चंद्र कोणत्या राशित, कोणत्या नक्षत्रात, कोणत्या नवांशात आहे ह्यावर मुख्यत्वेकरून अवलंबून असतो. म्हणून त्या दोघांच्या पत्रिकेतील चंद्राच्या स्थानानुसार वेगवेगळी वैशिष्ट्ये विचारात घेऊन निर्णय घ्यावा लागतो.

चंद्रनक्षत्रावर आधारित गुणमेलन पद्धतीत सर्वप्रथम दोघांची नक्षत्र-चरणे एकनाडी दोषात नाहीत ना हे पहायचे असते. त्यासाठी दाते पंचांगातील 'नाडीपाद वेध कोष्टक' उपयोगात आणावे. कोष्टक बघण्यास अत्यंत सोपे आहे. एका आडव्या पट्टीतील नक्षत्र-चरणांनाच फक्त एकनाडी दोष लागू होतो हे त्यातले तत्त्व आहे. परंतु त्यातील सुद्धा एकाच राशितील भिन्न नक्षत्रे असल्यास एकनाडीदोष लागू होत नाही हे लक्षात घेणे आवश्यक असते. एकनाडी दोष नाही हा एकदा निर्णय झाल्यावरच पुढे पहाणे सुरु करावे. अन्यथा 'पत्रिका जमत नाही' हा निर्णय घ्यावा. पुढील टप्प्यात प्रथम गुण पहाण्यासाठी गुणमेलन कोष्टकाचा उपयोग करावा. गुण १८ किंवा अधिक असल्यास 'पत्रिका जुळते' असा निर्णय होईल. परंतु १८ पेक्षा कमी गुण असल्यास मात्र पत्रिका जुळत नाहीत असा निर्णय होत नाही.

अशा वेळेस 'अभिनव विवाहमेलन' कोष्टकाचा उपयोग करावा. ह्यात वरील आडव्या पट्टीत सहा व उभ्या पट्टीत सहा राशि आहेत. उभयतांची नक्षत्र-चरणे ह्यापैकी कोणत्याही एका पट्टीत आल्यास 'पत्रिका जुळते' निर्णय होतो. तसेच एकाचे नक्षत्र-चरण आडव्या पट्टीत व एकाचे उभ्या पट्टीत असून त्यांच्या आडव्या व उभ्या छेदाच्या जागी रिकामी चौकट असल्यास 'पत्रिका जुळतात' असा निर्णय होतो. अशा वेळेस गुणसंख्या कमी असली तरी त्यास महत्त्व रहात नाही. परंतु छेदाच्या जागी फुली आल्यास मात्र 'पत्रिका जुळत नाहीत' असा निर्णय होतो.

ज्या वधू-वरांच्या राशि मृत्युषडाष्टक योगात असतील त्याठिकाणी गुणमेलन कोष्टकात सर्वत्र फुल्या दाखविलेल्या आहेत. म्हणजे त्यांच्या पत्रिका जुळत नाहीत असा गैरसमज होऊ शकतो. परंतु अशावेळेस उभयतांच्या नवमांशाचे (नक्षत्र-चरणांचे) संबंध बघावेत. दोघांचेही नवमांशस्वामी परस्परांचे मित्र असतील तर मृत्युषडाष्टक असूनही पत्रिका जुळतात. पूर्वीच्या पंचांगात मृत्युष्डाष्टक योगांच्या राशितील नक्षत्रांनासुद्धा गुण दाखविलेले असत ते योग्य होते असे वाटते. पुनश्च ती पद्धत सुरु करावी अशी माझी सूचना आहे.

थोडक्यात अशातऱ्हेने पत्रिकामेलन नीट समजावून घेतल्यास तीन कोष्टकांचा उपयोग करून शास्त्रशुद्ध पद्धतीने पत्रिका बघण्याच्या प्रक्रीयेतील पहिला टप्पा आपला आपण पार करता येणे सहज शक्य आहे. परंतु समजायला ही प्रक्रीया क्लिष्ट आहे हेही खरेच. ह्यावर उपाय मला सापडला. तो असा :-

# वैयक्तिक गुणमेलन कोष्टके

आपल्या मुलाचा किंवा मुलीचा विवाह जमविण्याच्या प्रक्रीयेत महत्त्वाचा अडथळा असतो तो म्हणजे पत्रिका जुळणे. सर्वसाधारण रिवाजानुसार दुसऱ्या पक्षास दिलेल्या पत्रिकांपैकी जुळणाऱ्या पत्रिकांचे प्रमाण सामान्यपणे चारात एक असते.म्हणजेच दहा स्थळांपैकीसात/आठ ठिकाणच्या संपर्कासाठीचे कष्ट व पैसा निष्कारण वाया जातात. त्याशिवाय बघण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर नापसंती कळविताना 'पत्रिका जुळत

नाही' ह्या गोंडस कारणाचा उपयोग करून नकार देणारे सुशिक्षित कितीतरी आहेत. ह्या शिवाय अनेक गैरसमज असतात. ते म्हणजे मूळच्या पत्रिकाच चुकीच्या असणे, एकनाड जमत नाही, ३६ गुण किंवा १८पेक्षा कमी गुण चालत नाहीत, मंगळदोष नसताना तो आहे असे समजणे, मंगळाच्या पत्रिकेस मंगळाचीच पत्रिका लागते, वगैरे. असे गैरसमज असल्याने कित्येकवेळा जुळणाऱ्या स्थळांकडेही पाठ फिरविली जाते व स्वतःहून अडथळे वाढवून घेतले जातात. सगळयात महत्त्वाचे म्हणजे पंचांगात गुणमेलनासाठी तीन कोष्टके आहेत हे बऱ्याच जणांना माहित नसते आणि जरी माहित असले तरी त्यांचा वापर करण्याबद्दल संपूर्ण अज्ञान असते.

परिणामतः ज्योतिषावर सर्वस्वी अवलंबून रहावे लागते. त्यासही पत्रिका जुळतात म्हणजे नक्की काय हे बहुधा माहित नसते. त्यामुळे अनेकदा चुकीचे निर्णय दिले जातात हा माझा ठाम अनुभव आहे. ह्यावर उपाय म्हणून सर्वप्रथम मला सामान्य माणसास उपयुक्त असे वैयक्तिक गुणमेलन कोष्टक बनविण्याची कल्पना सुचली. ती माझ्या कन्येच्या विवाहाचेवेळी मी अमलात आणली. तिची उपयुक्तता अनुभवल्यानंतर सर्वच्या सर्व म्हणजे प्रत्येक नक्षत्रचरणासाठी एक ह्याप्रमाणे तयार केलेल्या २१६ कोष्टकांपैकी उपयुक्त कोष्टकासहित माहिती फोल्डर स्वरुपात स्थळांना देण्यास मी सुरुवात केली. आत्तापर्यंत दीड हजाराहूनही अधिक स्थळांनी ह्या कोष्टकांचा उपयोग करून ह्या माझ्या उपक्रमाबद्दल धन्यवादही दिले आहेत. अनेक विवाह संस्थानी आपल्याकडील स्थळांना ह्या उपक्रमाची माहितीही दिली व अवश्य उपयोग करण्याची शिफारसही केली.

गरजेच्या कोष्टकासहित बनवून दिल्या जाणाऱ्या ह्या फोल्डरमधे प्रथम दुसऱ्या पक्षास देण्यासाठी जन्मपत्रिकेचा आराखडा करून दिलेला असतो. चुकीची किंवा अर्धवट माहितीची पत्रिका दिली जाऊ नये हा त्यामागचा उद्देश. शिवाय मूळची पत्रिका बरोबर आहे की नाही ह्याचीही एकदा चाचणी होते.

पुढील माहितीत मंगळदोष ह्याबद्दल शास्त्र काय सांगते ह्याचे साध्या सोप्या भाषेत विवरण आहे. सोबत वैयक्तिक गुणमेलन कोष्टकाचा उपयोग कसा करायचा व ज्योतिषाचा सल्ला नक्की कधी व कशासाठी घ्यावा हयाचे व्यावहारिक तंत्र दिले आहे.

त्यानंतर दिलेल्या कोष्टकात पत्रिका जुळतात की नाही हे पहाण्यासाठी पायरीपायरीने माहिती दिलेली असते. विशेष म्हणजे नाडी, गण, पंचांगातील तीन कोष्टकेह्यापैकी काहीही पहायला न लागता अक्षरशः पाच-दहा सेकंदात निर्णय घेता येतो. विशेष म्हणजे हे सर्व पहाण्यासाठी ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाची आजिबात गरज नसते. त्यामुळे अंधश्रद्धेपोटी ज्योतिषाचे निष्कारण महत्त्वही वाढविले जात नाही. असे कोष्टक स्वतःसाठी ज्यांना माझ्याकडून करवून हवे असेल त्यांनी आपले नाव, गोत्र, जन्मतारीख, जन्मवेळ(स्टँ. टा.) आणि जन्मस्थळ ह्याची माहिती देणे गरजेचे असते. ही माहिती दिल्यावर फोल्डर बनवून दिले जाते.

# चुकीची पत्रिका कशी ओळखावी?

समाज कितीही सुशिक्षित झाला तरी ज्योतिषशास्त्राचा उपयोग ह्या बाबतीत प्रचंड अंधःकार जाणवतो. परिणामतः माझ्याकडे येणाऱ्या जातकांपैकी जवळजवळ १० ते १५ टक्के पत्रिकांमधे चुका सापडतात. खास करून रात्री १२ ते पहाटे सूर्योदयादरम्यानचा जन्म असल्यास पत्रिका एका दिवसाने म्हणजेच परिणामतः एका नक्षत्राने चुकलेल्या सापडतात. कोणत्याही पत्रिकेत ढोबळमानाने ग्रह कुठे असतात हेच जर आपण माहिती करून घेतले तर आपल्यालाही चुकीच्या पत्रिकासहज ओळखता येतील. त्यासंबंधीची माहिती येथे देत आहे.

सर्वसाधारणपणे जिचा प्रामुख्याने विचार केला जातो ती 'जन्मलग्न कुंडली'. लग्न ह्या शब्दाचा ह्याठिकाणी अभिप्रेत अर्थ 'पूर्व दिशा' असा आहे. पूर्वदिशेचा संदर्भ घेऊन मांडलेला ग्रहस्थितीचा नकाशा म्हणजेच ही कुंडली. ह्यातील मधे असणाऱ्या मोठया चौकोनातील छोट्या चार चौकोनापैकी वरचा चौकोन म्हणजे पूर्व दिशा. उजवीकडचा चौकोन म्हणजे उर्ध्व म्हणजे डोक्यावरची दिशा. खालचा चोकोन म्हणजे पश्चिम दिशा तर डावीकडचा चौकोन म्हणजे अधर किंवा खालची(पायाखालची) दिशा होय.

आता काही ठराविक ग्रह पत्रिकेत कुठेकुठे असावेत हे सहजपणे कसे तपासायचे ह्याबद्दलचे काही सोपे अडाखे पाहू या.

**रवि (सूर्य) :** सूर्य सकाळी पूर्वेला असतो, दुपारी डोक्यावर, संध्याकाळी पश्चिमेला तर मध्यरात्री आपल्या पायाखाली असतो. त्यानुसार जन्मवेळेस रवि कोणत्या स्थानात असायला पाहिजे हे सहज समजण्याजोगे आहे. एकंदर १२ घरांमधून २४ तासात त्याचे भ्रमण होत असते. म्हणजेच प्रत्येक घरात साधारण २ तास सूर्य असणारच. ह्या प्रमाणे विचार केला तर सकाळी ६वाजता पूर्वेला म्हणजे वरच्या चौकोनात असतो तर ८ वाजता, १० वाजता, वगैरे वेळांना रवि कोणत्या स्थानात असेल हे आपणास सहज ठरविता येईल.

वेळेनुसार वरीलप्रमाणे रवि कोठे हे जसे ठरविता येते तसेच इंग्रजी तारखेनुसार तो काणत्या राशित असेल ह्याचाही अंदाज बांधता येतो. १४ जानेवारीस मकर संक्रातीस रवि मकर राशित प्रवेश करतो हे आपल्याला माहित आहे. बारा महिन्यात बारा राशिंचे भ्रमण पूर्ण करून परत १४ जानेवारीस मकर राशित प्रवेश होतो. म्हणजेच दर साधारण १२ ते १५ तारखे दरम्यान तो पुढील राशित जात राहतो. तो जन्मवेळी कोणत्या राशित आहे हे दर्शविण्यासाठी १ ते १२ ह्या राशिंच्या संख्यांचा उपयोग करतात. म्हणून १४ जानेवारीपासून पुढील महिन्यात जन्म असणाऱ्याच्या पत्रिकेत रवि सोबत १० ही संख्या लिहिलेली सापडते. ह्या हिशेबाने कोणत्याही जन्मतारखेस अंदाजे रवि कोणत्या राशित असायला पाहिजे हे आपल्याला ठरविता येते का ते पहा. कुंडलीत मांडलेले आकडे राशिंचे असतात व घडाळयाच्या काट्याच्या उलट्या दिशेने त्यांचा क्रम असतो.

**बुध :** नेहमी रविच्या घरात किंवा शेजारच्या म्हणजे पुढच्या किंवा मागच्या घरात असतो.

**शुक्र :** नेहमी रविच्या घरात किंवा पुढील दोन किंवा मागील दोन घरांमधेच असतो.

**तिथी :** चंद्र आणि सूर्य ह्यांच्यामधील संबंधांवर तिथी ठरते. अमावास्येजवळील दिवसात रवि-चंद्र एकाच घरात असतात तर पौर्णिमेला ते समोरासमोर असतात म्हणून समोरासमोरच्या घरात असतात. सूर्यापुढील सहा घरांमधे म्हणजेच पुढील आकडयांमधे चंद्र शुक्ल पक्षात तर आधीच्या

सहा घरात कृष्ण पक्षात असतो. चंद्र साधारण सव्वादोन दिवस एका राशित म्हणजे एका घरात असतो.

अशातऱ्हेने विचार केला तर पत्रिकेतील रवि, बुध, शुक्र व चंद्र हे ग्रह योग्य स्थानात आहेत की नाहीत हे जन्मतारीख, जन्मवेळ व तिथीवरून सहज मांडता येते.

मंगळ, गुरु, शनि, हर्षल, नेपच्यून हे ग्रह पृथ्वीच्या बाहेरच्या कक्षेत फिरत असल्याने त्यांच्या पत्रिकेतील जागा अनुभवाशिवाय सांगता येणार नाहीत. परंतु मूळची पत्रिका चुकीची असण्याची शक्यता रवि, चंद्र, बुध, शुक्र ह्यांच्या स्थानांवरून वाचकही आता सहजपणे व्यक्त करू शकतील.

# विवाहाचेवेळी रक्तगट पहावा का?

अनेक जातक हा प्रश्न ज्योतिषांना विचारतात. कारण म्हणे नाडी आणि रक्तगटाचा संबंध असतो. नाडया तीन आणि रक्तगट चार. कसा काय संबंध असणार? असा काहीही संबंध नसतो. खरं म्हणजे रक्तगटाचा प्रश्न हा ज्योतिषशास्त्राच्या कक्षेत बसणाराच नव्हे. तो विचारायला पाहिजे प्रसूतिशास्त्र तज्ज्ञ डॉक्टरांना. परंतु हा प्रश्न ज्योतिषांना नेहमी विचारला जातो व आपल्यालाही माहिती पाहिजे म्हणून मी पुण्यातील सुप्रसिद्ध डॉक्टरांना हा प्रश्न विचारला. तिघांनीही ठामपणे सांगितले की, 'विवाहाचेवेळी रक्तगट पहाण्याची आवश्यकता नाही.' तिघांच्याही मतात फरक नव्हता. म्हणजेच ते ग्राह्य मानायला हरकत नाही.

# विवाहयोग

योग असल्यास घटना घडण्यास चालना मिळते हे खरे. तरीही योग येणे आणि घटना घडणे ह्या वेगळया गोष्टी आहेत हे आपण पूर्वीच पाहिले आहे. म्हणजेच **विवाहाची तारीख कोणत्याही ज्योतिषाला काढता येत नाही** हे उघड सत्य आहे. फक्त शक्यता वर्तविता येते. निश्चिती नाही. तारीख काढून देणारे ज्योतिषी भोंदू असतात. जपा.

मूळात जातकाच्या कुंडलीत वैवाहिक सौख्याला बाधा आणणारी ग्रहस्थिती कितपत आहे व खास करून शुक्र कितपत शक्तिमान आहे हे पाहिल्यावर विवाहयोगांच्या शक्यते बद्दल वेध घेता येतो.

सर्वसामान्यपणे गुरुच्या गोचरीच्या भ्रमणावरून योगांची शक्याशक्यता बघतात. विवाहाचे कारक ग्रह शुक्र, चंद्र, सप्तमेश हे असून शनि व मंगळ हे खो घालणारे म्हणून प्रसिद्ध आहेत. ह्या पैकी ग्रह आणि कुंडलीतील सप्तमस्थान ह्यांच्यापैकी किती जणांशी गोचरीच्या गुरुचा शुभयोग किती ताकदीने व कोणत्या काळात आहे हे पहिले की योगांची शक्यता सांगता येते. जर वाजवी अटी असतील तर अशातऱ्हेने वर्तविलेल्या योगांच्या काळात विवाह झाल्याचे भरपूर अनुभव येतात.

विवाहयोग आले तरी अवाजवी अपेक्षांमुळे विवाह होत नसण्याचा खास करून मुलींच्या बाबतीतला अनुभव हा सद्यस्थितीतला ज्वलंत प्रश्न आहे. त्याबद्दल विवेचन करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. म्हणूनच न राहवून मी माझी मते येथे विषयाच्या ओघात मांडत आहे. खास विवाहेच्छू मुलींनी आणि त्यांच्या पालकांनी डोळसपणे ह्यासंबंधी चिंतन करावे अशी माझी नम्र आणि रास्त अपेक्षा आहे.

# अपेक्षांचा म. सा. वि.

'आमच्या मुलीचा विवाहयोग नक्की आहे तरी कधी?' पालकांतर्फे विचारल्या जाणाऱ्या हया प्रश्नांची वारंवारता दिवसेंदिवस वाढतच चालल्याचं मला जाणवलं. ज्योतिषशास्त्रानुसार विवाहयोग असणं आणि तरीही विवाह न होणं ह्याला समांतर उदाहरण द्यायचेच ठरविले तर, पावसाळयात भरपूर वृष्टी होत असूनही जलसंचय न करता 'दरवर्षी उन्हाळयात पाण्याची बोंब असतेच.' म्हणून निसर्गाला दोष देत राहणे हे होय. विवाहांच्या बाबतीत हल्ली पुष्कळदा हेच घडताना अनुभवाला येत आहे. त्याचे सखोल निरीक्षण केले तर जे निष्कर्ष निघतात तेच येथे मांडण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न.

हल्ली पदवीधर असणे ही शैक्षणिक पात्रता सामान्य म्हणून गणली गेली आहे. अर्थातच मुली पदवीधर होईपर्यंत २१ वय येऊन ठेपलेले असते. स्त्री-पुरुष बरोबरी ही निश्चित स्वागतार्ह असली तरी त्याच्या गैरवापरामुळे 'करिअर' नामक ज्वर तरुणींमधे सहज फैलावलेला जाणवतो. ह्या 'करिअर'च्या अंधत्वामुळे 'क्वालिफिकेशन' वाढवत राहणे व संसारात उशीरा पडण्याची स्वप्ने पाहणे येथूनच अपेक्षांचा म. सा. वि. कमी होत जाण्यास सुरुवात होते.

गणित विषयात संख्यांचा म. सा. वि. 'शून्य' कधीच येत नाही. निदान 'एक' तरी येतोच. पण ह्या अनुरुप जोडीदार शोधण्याच्या क्षेत्रात मात्र तो 'शून्य' कसा येतो ते आता पाहू या.

प्रथम आपला जोडीदार आपल्या जातीधर्माचा असावा लागतो. त्यानंतर योग्य वयाचा, अविवाहित, मुलीपेक्षा जास्त शिकलेला म्हणजे उच्चशिक्षित, स्वतःचे घरदार असणारा, मुलगी मिळवती असल्यास तिच्यापेक्षा जास्त उत्पन्न असणारा, शक्यतो गावातीलच, स्मार्ट ठराविक उंचीचाच आणि हे सर्व जमत असलं तर पत्रिका जुळणारा असावा. ह्या बहुतांशी सामाईक अपेक्षांव्यतिरिक्त दुय्यम अपेक्षांची यादी निकटचे नातेवाईक बनवत असतात. ह्यापैकी प्रत्येक अपेक्षेनुसार समाजातील अनुरुप व्यक्तिमत्त्वांची संख्या घटत तर जातेच पण पुढेपुढे हळूहळू एकीकडे वय वाढत चालल्यामुळे हातची स्थळे जाऊन म. सा. वि. शून्य होतो की काय ह्याची विवंचना खास करून 'मुलीच्या बापाला' (हा परंपरागत शब्दप्रयोग आहे) ग्रासून टाकते. माझ्याकडे येणाऱ्या जातकांपैकी काही दीनवाणे वधूपिते अक्षरशः रडल्याचे माझे अनुभव आहेत.

वरती नमूद केलेल्या अपेक्षांच्या यादीतील तीन अपेक्षा खास करून घातक म्हणून वर्गवारीत बसविण्यास हरकत नाही. बरोबरीचे युग आह

म्हणून प्रत्येक क्षेत्रात स्त्री पुरुषाची बरोबरी करण्याचा अंध प्रयत्न करीत असेल तर दोघांमधे शिक्षणात कमीजास्तपणा असणे साहजिक आहे. असे असताना कमी शिकलेला नवरा मुली का स्वीकारत नाहीत ह्याचे उत्तर बहुतांशी विवाहेच्छू कन्यका देऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. हीच पहिली जास्त शिक्षणाची अपेक्षा मुळातच मुलगी जास्त शिकलेली असेल तर पालकांची झोप उडविते असा अनुभव आहे.

दुसरी अपेक्षा म्हणजे मुलाची मासिक कमाई मुलीपेक्षा कमी असता कामा नये. हल्ली कॉम्प्युटर क्षेत्राची चलती असल्याने त्यातील पगारांचे आकडे ऐकले तर छाती दडपते. अशा परिस्थितीत भरपूर कमाई असणाऱ्या मुलीस त्याहूनही वरचढ कमाईचा जोडीदार शोधणे अवघड होऊन बसते.संसार करायचा म्हणजे नक्की काय करायचे ह्याबद्दलच्या समुपदेशनाचा शैक्षणिक व्यवस्थेतील अभाव पुढे मुलींना आणि पर्यायाने वधूपित्याला महागात पडल्याची उदाहरणे हळू हळू वाढताना आढळतात.

ह्यातील पहिल्या अपेक्षेच्या बाबतीत व्यक्तिचे कर्तृत्त्व शिक्षणावर अवलंबून असतेच असे नाही. म्हणून जोडीदाराचे नुसते शिक्षण न बघता त्याचे कर्तृत्त्व पहाणे गरजेचे आहे. तर दुसऱ्या अपेक्षेबाबत पैसा म्हणजे जीवन नसून जीवन जगण्यासाठी पैशाची गरज असते ह्याची जाणीव तथाकथित सुशिक्षित तरूण वर्गास असणे जरुरीचे आहे. ह्या दोन अपेक्षांच्या बाबतीत आपल्या पाल्यास सुजाण करण्याचे काम पालकांनी केल्यास विवाह जुळण्याचा मार्ग सुकर बनतो. परंतु आईवडिलांनीच अवास्तव स्वप्ने पाहून ती मुलांच्या मनावर बिंबविल्याने मुलांचे झालेले नुकसानही ह्या क्षेत्रात पुष्कळवेळा अनुभवास येते.

बाकी सर्व गोष्टी सुदैवाने जुळल्या तरी पत्रिका न जुळल्यामुळेही चांगली स्थळे हातची निसटतात. ह्यामधे समाजातील ह्या शास्त्रासंबंधीचे जाणून बुजून स्वीकारलेले अज्ञान आणि गैरसमज ह्यामुळेही नुकसान होत असते. अर्थात म्हणून पत्रिकाच न बघणे हा मात्र अशिक्षितपणाचा कळस होय.

थोडक्यात, वाजवी अपेक्षा, सज्ञान दृष्टीकोन आणि व्यावहारिकता ह्यांचा योग्य मेळ बसवून निर्णय घेतल्यास अपेक्षांचा म. सा. वि. शून्य कधीच येणार नाही व विवाहेच्छू आणि कुटुंबीय आनंदी, समाधानी होतील हे निश्चित.

ज्याप्रमाणे अवाजवी अपेक्षा ही अनिष्ट रुढी त्याचप्रमाणे विवाह संदर्भात अजून एक अनिष्ट रुढी म्हणजे ‘नोंदणी पद्धतीने विवाह’ ही होय. तिचाही विषयोघात परामर्श घेऊ या.

## नोंदणी पद्धतीने विवाह

नोंदणी पद्धतीने विवाहाचा मार्ग स्वीकारणे हा पूर्णतः सुशिक्षित अशिक्षितपणा आहे असा माझा अनुभवाअंती निष्कर्ष आहे. ही पद्धती जे स्वीकारतात ते मुख्यत्त्वेकरून दोन कारणे सांगतात. एकतर विवाहाचा खर्च परवडत नसणे व दुसरे म्हणजे धार्मिक विधींवर विश्वास नसणे.

ह्यापैकी खर्च परवडत नाही म्हणणाऱ्यांनी कार्यालय घेतलेले असते, जेवणावळीही होतात, फोटो-शूटिंग असतेच, आहेरही होतो. मग खर्च कुठे वाचतो? तर फक्त गुरुजींची दक्षिणा वाचल्याचा आभास होतो. परंतु प्रत्यक्षात तो तसा वाचत नसतो कारण रजिस्ट्रारला आणायला पाहोचवायला गाडी पाठवावी लागते. शिवाय स्वतंत्र भारतास मिळालेल्या शापानुसार दक्षिणा(लाच) द्यावीच लागते. थोडक्यात हे कारण असत्य ठरते.

विधींवर विश्वास नाही म्हणून ह्या पद्धतीने विवाह केलेल्यांच्या मुलांच्या मुंजीचे निमंत्रण मला अनेकदा आलेले आहे. कदाचित रजिस्टर पद्धतीने व्रतबंध करण्याची रुढी अजून प्रचलित नाही हे त्यांचे दुःख असावे.

ह्याशिवाय विशेष विनोदाचा भाग म्हणजे घेतली जाणारी शपथ होय. भारतीय न्यायपद्धतीत जशी ‘देवाशपथ खरं सांगेन’ म्हटल्यावर ‘खोटं सांगणार नाही’ अशी पारंपारिक अशिक्षित पुष्टी जोडावी लागते, त्याचप्रमाणे येथेही नुसतीच विनोदी नव्हे तर मूर्खपणाची शपथ असते हे तिच्यातील ‘मी ........ हिचा कायदेशीर पत्नी म्हणून स्वीकार करतो’ ह्या शब्दांकनातून स्पष्ट होते. ह्यावर ताण म्हणून की काय तिथे जमलेले तथाकथित सुशिक्षित अशी शपथ घेतल्याबद्दल टाळयांचा कडकडाटही करतात. शिवाय संस्कारांवर विश्वास नसला तरी मंगळसूत्र बांधण्याचा विधीही होताना दिसतो. हा अशातऱ्हेने फार्स करण्यापेक्षा दोन हारांच्या खर्चात, देवाला साक्षी ठेऊन सर्वात कमी खर्चात विवाह करायला काहीच हरकत नाही. तसेच लाच देण्यापेक्षा चार मंत्र म्हणणाऱ्यांना दक्षिणा देण्याने निदान भ्रष्टाचारास खतपाणी तरी घातले जाणार नाही ह्याची निश्चितच काळजी घेता येईल.

## नक्षत्रशांति करावी का? कधी करावी?

मनुष्य जीवनावर पृथ्वीला सर्वात जवळ असणाऱ्या चंद्राचे परिणाम जास्त प्रकर्षाने जाणवतात. ह्या परिणामांचे शुभाशुभत्व चंद्र ज्या नक्षत्रात असेल त्यावर अवलंबून असते. अशुभ परिणाम टळावेत म्हणूनचा उपाय म्हणजेच नक्षत्रशांति. ह्या शास्त्रीय विधींचा उपयोग होतो असा अनुभव आहे. जन्मनक्षत्रच माहित नसल्यामुळे किंवा विश्वास नसल्यामुळे शांति न केलेल्या व्यक्तींच्याबाबतीत अशुभ परिणाम झालेले अनुभवास येतात. तसेच नक्षत्रशांति केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत अशुभ फळे टळल्याचे जाणवते.

नक्षत्रशांतिचा शास्त्रशुद्ध विधी शक्यतो जन्मानंतर लगेच किंवा लहानपणीच करावा हे उत्तम. परंतु कोणत्याही कारणामुळे उशीर झाल्यास नंतरही करायला हरकत नाही.

## सहस्त्रचंद्रदर्शन

आपल्या कुटुंबातील प्रिय वडीलधारी व्यक्ती वयाची ८० वर्षे पूर्ण करते तेव्हा साहजिकच सहस्त्रचंद्रदर्शन विधी करावा व आपला त्या

व्यक्तीबद्दलचा आदर, आपले प्रेम, त्यांनी आपल्यासाठी आयुष्यभर घेतलेल्या कष्टांबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी अशी इच्छा कुटुंबियांच्या मनात खचितच निर्माण होत असते. परंतु नक्की कधी हा विधी करावा? तसेच आयुष्यातील सहस्त्र चंद्र मोजण्याची आपली संस्कृती काय आहे ह्यासंबंधी मार्गदर्शन करणारे सापडतच नाहीत. मोघम माहिती देणारे बरेच असतात. ही परिस्थिती हेरून ह्या माहितीपत्रकाच्या निमित्ताने संपूर्ण माहिती येथे देत आहे.

मुस्लिम धर्मानुसार सांगितलेला 'दूजका चाँद' आणि हिंदू संस्कृतीनुसार महत्त्व दिलेला 'शुद्ध द्वितीयेचा चंद्र' एकच आहे.

ह्याच चंद्राला महत्त्व का? तर अमावास्येस चंद्र दिसतच नाही. शुद्ध प्रतिपदेस तो सूर्यापासून फारच जवळ म्हणजे फक्त १२ अंशांवर असल्याने त्याची अतिशय बारीक कोर सायंकाळी सूर्यास्तानंतर पश्चिमेस शोधावी लागते. दिसली तरी तेजस्वी व आकर्षक तर मुळीच नसते.

दुसऱ्या दिवशी म्हणजे शुद्ध द्वितीयेस मात्र त्यांच्यात २४ अंशाहून अधिक अंतर पडल्याने सायंकाळी सूर्यास्तानंतर बराच वेळ मनमोहक चंद्रकोरीचे दर्शन होत असते. **ह्या चंद्रदर्शनालाच 'चंद्रदर्शन' असे संबोधतात.** काही प्रसिद्ध ज्योतिषीसुद्धा पौर्णिमेचे चंद्र मोजतात ते साफ चूक आहे. हेच ज्योतिषी ८० वर्षातील खग्रास चंद्रग्रहणांचाही समावेश मोजणीत करून आणि त्या दिवशी दोनदा चंद्रदर्शन मोजून केविलवाण्या विनोदात आणखीनच भर घालतात असा माझा अनुभव आहे. एकतर कोणतेही ग्रहण पृथ्वीवर सर्वत्र कधीच दिसत नसते. मग जेथे ग्रहण दिसतच नाही तेथील लोकांनी दोनदा चंद्रदर्शन का मोजायचे ह्याचे उत्तर मात्र तसे सांगणाऱ्यांकडे नसते. असो.

८० वर्षांची १२ पट म्हणजे ९६०. म्हणजे ९६० चांद्रमास ८० वर्षात होतात. त्यात ८० वर्षांच्या कालावधीतील साधारण ३२ अधिक मास मिळविल्यास एकूण ९९२ मास होतात. पुढील ८ मासांची कमतरता भरून काढण्यासाठी ८१व्या वर्षातील साधारण ८ चांद्रमास मोजल्यास आयुष्यातील १००० चांद्रमास म्हणजेच त्या अनुषंगाने १००० शुद्ध द्वितीया पूर्ण होत असतात.

आता ही मोजणी आपल्या कुटुंबातील मान्यवरांच्या बाबतीत नक्की कोणत्या दिवशी पूर्ण होणार हे माहिती झाल्यास किती कौतुक वाटेल? त्या दिवशी संध्याकाळी आपले आजोबा किंवा आजी नक्की आपल्या आयुष्यातील १०००व्या शुद्ध द्वितीयेच्या चंद्राचं दर्शन घेतील व कृतकृत्य होतील.

वरील विशेष दिवसासाठीचा प्रत्यक्ष गणितासह संपूर्ण अहवाल मी आत्तापर्यंत अनेकांना करून दिला आहे. अजूनही कोणास असा अहवाल करून हवा असेल तर माझ्याशी संपर्क साधायला हरकत नाही. मला फक्त आपल्या आजोबा किंवा आजींची जन्मतारीख, जन्मवेळ ही माहिती द्यावी लागेल. अर्थात करणावळ असणारच. साधारण जानेवारी १९३१ पासून पुढील वर्षातील जन्मतारखा असणाऱ्यांना हा आनंद उपभोगता येईल.

# कालसर्पयोग

ह्या नावाचा ग्रहयोग असल्याचा उल्लेख खरं म्हणजे कोणत्याही मूळ ग्रंथांमधे नाही. पंचांगकर्ते दाते ह्यांनी ह्यासंदर्भात दोनवेळा पंचांगात लेखही प्रकाशित केलेला आहे. कै. धुंडीराजशास्त्री दाते लिखित 'धर्मशास्त्रीय निर्णय, भाग १' ह्या ग्रंथामधेही ह्यावर विवरण आहे.

परंतु तरीही समाजामधील भय कमी होत नाही. ह्या तथाकथित योगाबद्दलच्या अशक्यतेबद्दल गणिती विवेचन असे.

राहु आणि केतुच्या एका अंगास इतर सर्व ग्रह असल्यास तथाकथित 'कालसर्पयोग' मानणारे मानतात. आता विचार करू. पत्रिकेत सर्व ग्रह घडाळयाच्या काट्याच्या विरुद्ध दिशेने फिरतात. राहुकेतु मात्र सुलट दिशेने फिरतात. त्यातील प्रत्येक ग्रह कमीजास्त वेगाने फिरत असतो. सर्वात वेगात चंद्र फिरतो तर सर्वात सावकाश शनि(ह्यात हर्षल, नेपच्यून विचारात घेत नाहीत) फिरतो.

समजा, सर्व ग्रह राहु-केतुच्या एका अंगात आहेत व चंद्र राहुवर किंवा केतुवर आहे. चंद्र सर्वात वेगवान असल्यामुळे तो इतर सर्व ग्रहांना मागे टाकत टाकत समोरच्या राहु अगर केतुवर पोहोचेल. अर्थातच ह्या कालावधीत सर्व ग्रह एकाच अंगास असणारच. हा कालावधी म्हणजे जसा काही पैर्णिमा ते अमावास्या पर्यंतचा १३ ते १४ दिवसांचा अवधी असतो. म्हणजे ह्या १४ दिवसात पृथ्वीवर जन्माला आलेले सर्वच्यासर्व म्हणजे वस्तुस्थितीत लाखो करोडो लोक कालसर्प योग असणारे असतील. ह्या सर्वांनी तीर्थक्षेत्री जाऊन 'कालसर्प योगाचा विधी' करायचा का? केवढी ही अंधश्रद्धा !

कालसर्प योगावर अनेकांनी पुस्तके लिहिली आहेत. त्यांचा खप भरपूर आहे. जास्त खप नाशिकला आहे. परंतु हा खप म्हणजे समाजाच्या कमकुवत मानसिकतेवर केला जाणारा गैरव्यवसाय आहे असे माझे प्रांजल मत आहे.

कालसर्पयोगावरील काही ग्रंथामधे 'कालसर्प योग' ऐवजी फक्त 'सर्प योग' मान्य करून प्रत्येक स्थानातील राहुच्या स्थितीनुसार बारा प्रकारचे योग व त्यांची नावे देऊन विवरण केलेले आढळते. ह्यामधे इतर ग्रह एकाच अंगास असले पाहिजेत अशी अट नाही. तसं पाहिलं तर प्रत्येक ाच्या पत्रिकेत राहु कोणत्या ना कोणत्या स्थानात असणारच. म्हणजे ह्या बारा सर्पयोगांपैकी एक योग प्रत्येक पत्रिकेत असणारच असा अर्थ होतो. हे काही प्रमाणात मान्य करायला हरकत नाही. कारण प्रत्येक मनुष्यास नशिबाने काही वाईट किंवा अशुभ गोष्टी मिळालेल्या असतातच. त्यामधे राहुकेतुंचा कमीजास्त प्रमाणात वाटा असतो हा तर्कसंगत विचार होऊ शकतो. कारण राहुकेतुंची बहुतांशी फले अशुभच आहेत ही वस्तुस्थिती आहे.

थोडक्यात, कालसर्पयोगाच्या झालेल्या अपप्रचाराला समाजाने बळी पडू नये.

कोणत्याही ज्योतिषाने आपल्या आप्तेष्टांपैकी कौणाच्याही पत्रिकेत वरीलपैकी योगांबद्दल वर्णन केल्यास त्याचे म्हणणे निरीक्षणे,

कारणांसहित लेखी घ्यावे. 'सेकंड ओपिनियन' च्या प्रचलीत गरजेनुसार आणखी एकदोन ज्योतिषांना तो 'रिपोर्ट' दाखवून त्यांचेही मत लेखी घ्यावे व मगच योग्य तो निर्णय घ्यावा.

# अंकज्योतिष किती सत्य? किती असत्य?

हल्ली 'अंकज्योतिष' नावाचे एक तथाकथित 'शास्त्र' फारच बोकाळलेले आहे. टीव्हीवरील अनेक कार्यक्रमातून त्याचा अनाहूतपणे प्रचार आणि प्रसार होताना अनुभवाला येतो. पुण्यात ज्योतिषशास्त्रांच्या वर्गांमधेही ह्या विषयीचे वर्ग घेतले जातात. विविध भारतीवरून प्रसारित होणाऱ्या एका कार्यक्रमातून एका महिला ज्योतिषीने सुप्रसिद्ध व्यक्तिं ना सांगितलेले भाकीत आणि दिलेला सल्ला कसा खरा ठरला ह्याचा डांगोराही पिटला जात असे. चौकशी केल्यावर माहिती मिळाली की, त्यांची फी फक्त अडीच हजार रुपये त्याकाळात होती व साधारण दोन महिन्यानंतरची 'अपॉईंटमेंट' दिली जात असे.

ह्या सर्व वस्तुस्थितीचे वर्णन करण्यामागचा उद्देश एवढाच की 'ज्योतिष' ह्या शब्दामागे चिकटविलेली 'गूढ' ही बिरुदावली जनमानसात किती खोलवर रुजविली गेली आहे ह्याची कल्पना वाचकास यावी. इंग्रजी तारखांचा वापर करून प्रसिद्धीस पावलेल्या ह्या तंत्रानुसार मार्गदर्शन करणाऱ्या ज्योतिषांना मी विचारलेले प्रश्न पुढे देत आहे. ज्यांचे लेख दिवाळी अंकात ह्या विषयावर प्रसिद्ध झालेले आहेत अशा पाच ज्योतिषी लेखकांना ही प्रश्नावली देऊन उत्तर देण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. परंतु दीड वर्ष झाले तरी एकही ज्योतिषी उत्तरे देऊ शकला नाही. उत्तरे देता येणारही नाहीत हे नक्कीच. त्यांना विचारलेले प्रश्न असे :-

तथाकथित अंकज्योतिषशास्त्रात इंग्रजी तारखेवरून भाग्यांक ठरवितात.

जर तसे असेल तर--

(१) इंग्रजी तारखा मुळात ग्रहांच्या संदर्भाने ठरविलेल्या आहेत का? असल्यास कशा पद्धतीने?

(२) फक्त दिनांक विचारात घ्यायचा की संपूर्ण तारीख? का?

(३) जन्म दिनांकाचा, त्यातील महिन्याच्या क्रमाचा आणि इसवी सनाच्या संख्येचा कोणकोणत्या ग्रहांशी कोणता आणि कसा संबंध असतो? त्यानुसार भाग्यांक कसा ठरतो ह्याची कारणमिमांसा काय?

(४) इसवी सनच का घ्यायचा? अन्य शकप्रणाली का नाही?

(५) तारीख ज्युलियन घ्यायची की ग्रेगरियन? का?

(६) ३१ तारखेस असणारा भाग्यांक दुसऱ्यादिवशी क्रमवारीने पुढील न येता कमी होत असेल तर त्या मागचे शास्त्र काय?

(७) जे महिने एकतिशी आहेत ते आणि तेच एकतिशी का? त्यांचा ग्रहस्थितीशी काही संबंध आहे का? असल्यास कोणता?

(८) रात्री १२ वाजताच भाग्यांक का आणि कसा बदलतो?

(९) 'डेट लाईन' च्या पूर्वेस व पश्चिमेस वेगवेगळे भाग्यांक असण्याचे कारण काय?

(१०) छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मतारीख १९ फेब्रुवारी १६३० आहे. त्यांचा भाग्यांक किती व कसा?

ह्या प्रश्नांची उत्तरे कोणत्याही अंकज्योतिषास सापडल्यास कधीही मला कळवावीत. मी त्यावर चिंतन अवश्य करेन.

# खडयांचा उपयोग होतो का?

सूर्यावर झालेल्या स्फोटांपासून ग्रहमाला बनलेली आहे. परिणामतः अनेक मूलद्रव्ये कमीजास्त प्रमाणात सर्वत्र फेकली गेली. त्यापासून ग्रह बनले. कोणत्याही ग्रहात एकत्रित झालेल्या मूलद्रव्यांमधे जे मूलद्रव्य ज्या प्रमाणात जास्त असेल त्या मूलद्रव्याच्या कारकत्व आणि रंगानुसार त्या ग्रहाला रंग आणि कारकत्व प्राप्त झालेले असते. त्या कारकत्वांमधे गुरुत्वाकर्षणासह अनेक दृष्य वा अदृष्य शक्तिंचा समावेश असतो. अशातऱ्हेने इतर ग्रहांना जी मूलद्रव्ये लाभली तीच कमीजास्त प्रमाणात पृथ्वीलाही लाभली. ती अजूनही खाणींमधून उपलब्ध आहेत. ह्यांचे छोटे तुकडे आपण त्या-त्या प्रकारच्या(रंगानुसार) ग्रहांचे म्हणून परिधान करतो. ज्याप्रमाणे गुरुत्वाकर्षणाचे बल दोन वस्तूंच्या वस्तुमानांच्या प्रमाणात आणि त्यांच्यातील अंतराच्या वर्गाच्या व्यस्त प्रमाणात असते, त्याचप्रमाणे मनुष्याचे शरीर आणि तो खडा म्हणजेच मूलद्रव्य ह्यामधील अंतर जरी अत्यंत कमी असले तरी अपूर्णांक एककातील अंतराच्या वर्गामुळे छेद(भाजक) खूप लहान(नगण्य) झाल्याने परिणामी बल खूप वाढते. परिणामतः खडयांचा उपयोग होत असल्याचे अनुभवास येते.

**ज्योतिषशास्त्रीय संशोधनास सहकार्य /मदत करण्याचे**

# विनम्र आवाहन

कोणत्याही गोष्टीचा मूलभूत पद्धतीने अभ्यास करणे किंवा संशोधन करणे हा माझा मूळ स्वभाव आहे. त्यातून ज्योतिषशास्त्र आणि गणित हे माझे अत्यंत आवडते विषय आहेत. ज्योतिषशास्त्राच्या बाबतीत शास्त्रशुद्ध पद्धतीने संशोधन होत नाही असे माझे प्रांजल मत आहे. ज्योतिषांच्या पोथीनिष्ठ अभ्यासामुळे आणि ग्रंथात आहे म्हणून ते बरोबर ही विचारसरणी संशोधकास कधीच मान्य होत नसते. शास्त्र कधीही गूढ नसते. तर कदाचित ते समजायला अवघड असू शकते. ज्योतिषशास्त्राला 'गूढ' ज्योतिषांनीच बनवले आहे असे माझे अनुभवसिद्ध मत आहे. परंतु ह्याच विचित्र परिस्थितीचा फायदा अंधश्रद्धा निर्मूलनवाले उचलत असतात.

म्हणूनच ह्या विषयाचे संशोधन करण्याचा निश्चय मी केला. मी संशोधनास घेतलेले विषयसुद्धा अतिशय उपयुक्त असे आहेत. ते असे :-

(१) ज्योतिष हे शास्त्र आहे का? आणि उपयुक्त आहे का?

(२) एकमेकांच्या पत्रिकांचा एकमेकांवर परिणाम होतो का?

(३) पंचमस्थानावरून संततीचा विचार (त्या अंतर्गत उपयुक्त संकल्पना : आपल्या आपत्याची पत्रिका आपणच ठरवा.)

(४) सप्तमस्थान (वैवाहिक जीवन) :- वस्तुस्थिती आणि उपयोग.

वरील विषयांवर 'हा सूर्य, हा जयद्रथ' तत्त्वाने संशोधन करण्याचा माझा प्रयत्न असतो. अर्थात त्यासाठी भरपूर उदाहरणांचा परामर्श घेणे गरजेचे आहे. अशा उदाहरणांचा मोठा साठा जमा करण्यासाठी मला आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

आपण फक्त एवढेच करायचे, आपल्या नात्यागोत्यात, परिचयात जर संतती किंवा वैवाहिक जीवन ह्यांच्याशी संबंधित कोणतेही उदाहरण असले तरी त्याची माहिती मला द्यावी ही नम्र विनंती. आयुष्यभर अविवहित राहिलेल्यांपासून पत्रिका न पाहता उत्तम संसार करणाऱ्यांपर्यंत कोणत्याही प्रकारचे उदाहरण मला उपयुक्त ठरू शकते.

तसेच फक्त पुत्र संतती किंवा कन्या संततीपासून वैश्ष्टियपूर्ण संततीपर्यंत, ज्यांना संततीच नाही त्यांच्यापासून संततीची अपेक्षा पूर्ण होण्यासाठी ज्योतिषशास्त्रीय सल्ल्याची अपेक्षा असणाऱ्यांपर्यंतची कोणतीही उदाहरणे मला संशोधनास उपयुक्त ठरू शकतात.

आपल्या अपत्याचा जन्म शुभ ग्रहस्थिती असताना झाला म्हणजेच अशुभ योग नसताना झाला तर त्याची पत्रिका चांगली असेल. अर्थातच त्याचे जीवन सुकर, समाधानी, चांगले जाईल. हा विचार प्रत्यक्षात उतरविण्यासाठी मी संशोधन करीत आहे. ज्याअर्थी कुटुंबनियोजनाची साधने वापरून गर्भधारणा थांबविता येते तर योग्य वेळेस जन्म होण्यासाठी प्रयत्न नक्कीच फलदायी ठरू शकतील हा ह्या संशोधनामागचा विचार आणि उद्देश आहे.

समाजाच्या सहकार्यावरच माझी संशोधनाची इमारत उभी राहू शकते. म्हणूनच
आपल्या भरघोस सहकार्याची मी अपेक्षा करतो. त्यासाठी आपण अवश्य संपर्क साधावा ही मनापासून तळमळीची विनंती.

**विवाहाशीसंबंधीत अनिष्ट रुढया**

फक्त नवरदेवाचे औक्षण करू नका. नवरीचेही करा. तो शास्त्रशुद्ध विधी आहे. मानपान नव्हे.
साखरपुडा हा शास्त्रीय विधी नाही. अनिष्ट रुढयांना खतपाणी घालणे हे सुशिक्षिताचे लक्षण नव्हे.
केवळ हौसे खातर अशा 'पाट्या' करणे आणि तेही वधूपक्षाच्या जीवावर ह्यात कुठला पुरुषार्थ?
हे बंद करण्यासाठी स्वतः पासून सुरुवात करा.

**विवाह सेहळयातील अशाच अनेक मानपानाच्या अनिष्ट रुढयाही मोडून काढा.**


**फक्त गुणमेलनावर कधी पत्रिका जुळत नसतात.**

यशस्वी, समाधानी संसारासाठी

ज्योतिषपंडित **सुधीर दाते** निर्मित

वधू-वर कुंडलीमेलन

**संपूर्ण अहवाल**

करवून घेणे आवश्यक आहेच. अवश्य उपयोग करा.